Vol 3 Issue 9 Oct 2013

Impact Factor : 0.2105(GISI)

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-9, Oct-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# पंचायत राजव्यवस्था आणि महिला आरक्षण धोरण : विश्लेषणात्मक अध्ययन कर्जत तालुक्याच्या संदर्भात

**चंद्रकांत मंगल गोंधळी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,कोकण ज्ञानपीठ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कर्जत, रायगड.

***सारांश :*** प्रस्तुत शोधनिबंधात पंचायत राजव्यवस्थेत 73 व घटनादुरूस्तीनंतर महिलांसाठी जी आरक्षणाची तरतुद करण्यांत आली त्या तरतुदीनुसार कर्जत तालुक्यातील पंचायत राजव्यवस्थेमधील महिलांच्या राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यांत आला आहे. संशोधनासाठी कर्जत तालुका हे क्षेत्र निवउले असुन तालुक्यात 1995 ते 2005 या कालावधीत निवडुण आलेल्या लोकप्रतिनिधीकडून प्रश्नावलीच्या माध्यमातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे महिला आरक्षण धोरणाचे विश्लेषण करण्यांत आले आहे.

### *प्रस्तावना :*

पंचायत राज्य व्यवस्था लोकशाही विकेंद्रीकरणचा परिपाक असून लोकशाही व्यवस्था तळागाळापर्यंत रूजविण्यासाठी पंचायत राज व्यवस्था प्रस्तापित होणे आणि अधिक दृढमूल होणे आवश्यक असते. त्यामुळे खरी लोकशाही आणि सहभाग प्रधान लोकशाही स्थापन होऊ शकते. सहभागी लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक घटकांचा सहभाग अपेक्षित असतो म्हणुन महिलांचा सहभाग देखील महत्वाचा ठरतो. परंतु केवह रचनात्मक बदल करून उद्दिष्टपुर्ती होत नाही. त्यासाठी गुणात्मक, मुलात्मक बदल होणे आवश्यक असते. भारतात लोकशाही स्थापित झाली. तिचे विकेंद्रीकरण होऊन पंचायत राज व्यवस्थाही आली. त्या व्यवस्थेला 66 वर्ष होऊनही प्रत्यक्षात सहभागी लोकशाही येऊ शकली नाही. म्हणुनच जाणीवपुर्वक 73 व्या व 74 व्या घटनादुरूस्ती संमत करून महिलांसाठी पंचायतराज व स्थानिक संस्थात 1/3 जागा आरक्षित करण्यांत आल्या हा निर्णय केवळ राजकीय ठरत नाही तर एकुण व्यवस्थापक परिवर्तनाचा ठरतो.

### *पंचायत राज : ऐतिहासिक पार्श्वभूमी :*

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसींचा विचार करून महाराश्ट्रात पंचायत राजव्यवस्था अंमलात आणण्यासाठी तत्कालीन महसुल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरणाची समिती 27 जुन 1960 साली नेमण्यांत आली या समितीने वेगाने काम करून 15 मार्च 1961 रोजी आपला अहवाल सादर केला. या अहवालाच्या आधारे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा 1961 त्यावर्षी करून घेतला. 24 मे ते 14 ऑगस्ट 1961 अखेर जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचे काम पुर्ण झाले. 15 ऑगस्ट 1962 पासुन लोकप्रतिनिधीच्या मार्फत या संस्थांचा कारभार सुरू झाला. त्यावेळेस पंचायत राज्य संस्थामध्ये महिलांना कुठलाही वाव दिला जात नव्हता. महिलांचे कार्यक्षेत्र राजकारण नसुन केवळ चुल आणि मूल एवढया पुरतेच मर्यादित आहे असा समज पुरूष प्रधान संस्कृतीने निर्माण केला होता. वास्तविक पाहता स्वतंन्त्र्य लढयात महिलांनी आपली कर्तुत्व क्षमता सिध्द करून दाखविली. तरी सुध्दा स्थानिक राजकारणात महिलांची दखल घेण्यात आली नव्हती. बलवंतराय मेहता समितीने मात्र गावच्या जिल्हयाच्या तालुक्याच्या कारभारात महिलांनाही सहभागी होणे आवश्यक आहे हे ओळखुन पंचायती संस्थावर दोन महिला नियुक्त करण्याची शिफारस केली. त्यानुसार दोन महिलांची नियुक्ती कबेली जाऊ लागली. पण स्थानिक वर्गातील प्रस्थापित पुरूष वर्ग आपल्या नातेसंबंधातील महिलांची नियुक्ती करू लागले. नियुक्त झालेल्या महिला बैठकीला उपस्थित न राहता त्यांच्या घरीच रजिस्टर पाठवुन त्यांची स्वाखरी किंवा अंगठा घेतला जात होता. त्यामुळे पंचायत संस्थामधील नेमणुकीच्याद्वारे महिलंचा जो सहभाग होता तो नाममात्र व परिणामशुन्यच राहिला. सर्वसामान्य अनुसुचित जाती व जमातीतील महिलांना तर पंचायत राज संस्थांच्या कार्यालयाकडे फिरकण्याचे स्वातंन्त्र्य नव्हते. प्रत्यक्षात राजकी सहभाग तर फार दुरची गोष्ट होती.

### *महिला आरक्षण धोरण :*

स्थानिक राजकीय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा त्यांचा विकास व्हावा आणि राजकीय व सामाजिक आर्थिकदृष्टया सक्षम व्हाव्यात या उद्देशाने पंचायत राज्य संस्थामध्ये महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाची तरतुद 1993 मध्ये 73 व्या घटनादुरूस्तीने करण्यांत आली. या महिला आरक्षणामुळे हजारो वर्शाच्या दुय्यम पातळीवरच्या जीवनानंतर पुरूषांच्या मानलेल्या राजकीय क्षेत्रात ख—या अर्थाने आज कुठे महिला पावलं टाकायला लागल्या आहेत. त्यामुळे राजकीय क्षेत्राात वर्शानुवर्श राजकारण करणा—या पुरूषांबरोबर एकदम त्यांची तुलना करणे योग्य होणार नाही. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या कौटुंबिक जबाबदा—या सांभाळुन राजकारण करावे लागणार आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की 33 टक्के महिला आरक्षणामुळे महिलांच्या राजकीय सहभागाच्या कधीही न थांबणा—या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. आज संपुर्ण देशातील पंचायत राजसंस्थेत 10 लाख महिला निवडुण आल्या आहेत. तर महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमध्ये 1 लाख महिला निवडुण आल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने 2011 पासुन पंचायत राज व्यवस्थेत महिलांना 50 टक्के आरक्षण लागु केले आहे.

### *शोधनिबंधाचा उद्देश :*

महिला आरक्षणामुळे पंचायत राजसंस्थांमध्ये आज लाखो महिला लोकप्रतिनिधी म्हणुन काम करीत आहेत. पण त्यांच्या बाबतीत असे मोघम बोलले जाते की महिला लोकप्रतिनिधी म्हणून नाममात्रच आहे. खरा कारभार त्यांचे पतीच पाहतात. त्या बैठकीला हजरही नसतात आणि ज्या हजर असतात तया बैठकीत बोलतही नाही. त्यांच्यामध्ये निर्णयक्षमता नाही. त्यांच्यात आत्मविश्वास नेतृत्व गुण नाहीत त्यांना राजकीय कामकाज जमत नाही. एकंदरीत महिला आरक्षण धोरण अयशस्वी झाले आहे. याचा शास्त्रशुध्द पध्दतीने शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. प्रस्तुत विशयांच्या अध्ययनाकरिता अध्ययन क्षेत्र म्हणुन रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्याची निवड केली आहे.

### *कर्जत तालुका पार्श्वभुमी :*

रायगड जिल्हयातील कर्जत तालुका हया कोकणातील महत्वाचा तालुका असुन जागतिक नकाशात त्यांचे स्थान अक्षांशामध्ये 150.48 उ ते 220. 61उ व रेखांश 720.36 पूर्व ते 800.54 पू इतके आहे. कर्जतचे क्षेत्रफळ 651.2 चौ. कि.मी. असुन ग्रामीण भागाचे 631.00 चौ.कि.मी. व शहरी भागाचे 20.2 चौ.कि.मी. आहे.शहरी भागात कर्जत, नेरळ व माथेरान या शहरांचा समावेश होतो. तालुक्यात एकुण 175 गावे/वस्त्या असुन 50 ग्रामपंचायती आहेत. कर्जत तालुक्यात 1981 साली झालेल्या जनगणनेनुसार तालुक्याची एकुण लोकसंख्या 12,9492 होती. त्यात पुरूषांची संख्या दर हजार पुरूषांमागे 938 होती. सन 1991 साली झालेल्या जनगणनेनुसार तालुक्याची एकुण लोकसंख्या 154788 होती. महिलांची संख्या दर हजार पुरूषांमागे 938 होती. त्यात पुरूषांची संख्या 79595 व महिलांची संख्या 75287 होती. पुरूषांचे शेकडा प्रमाण 51.36 टक्के तर महिलांचे शेकडा प्रमाण 48. 64 टक्के होते. महिलांची संख्या दर हजार पुरूषांमागे 947 होती. तालुक्यात साक्षरता 74.06 टक्के आहे. त्यामध्ये पुरूष साक्षरता 82.44 टक्के आहे तर स्त्री साक्षरता 66.32 टक्के आहे.

*अभ्यासविषयांची गुहितके :*
विषय अध्ययनाच्या अनुशंगाने गुहितकृत्यांची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.
1.महिला आरक्षणाने पंचायत राजसंस्थांमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.
2.स्थानिक सत्तेत महिलांचा राजकीय सहभाग परिणामकारक दिसत आहे.
3.म्हिला आरक्षण धोरण महिलांच्या सक्षमीकरणासाठी लाभदायक ठरत आहे.

*संशोधनपध्दती :*
अध्ययनासाठी कर्जत तालुका निवडला असुन 1995 ते 2005 मध्ये झालेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषदेच्या निवडणुकीत निवडुण आलेल्या महिला लोकप्रतिनिधीना समग्र मानण्यात आले. प्रस्तुत अध्ययनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील यादुच्छिक नमुना निवड प्रकारानुसार आणि गैर संभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करून विश्वसनीय प्रामाणिक आणि प्रतिनिधीक स्वरूपाच्या ग्रामपंचायत पंचायत सकिती व जिल्हा परिषदेतील एकुण 150 महिला उत्तरदात्याची नमुना म्हणुन निवड केली. मुलाखत अनुसूची व निरिक्षण पध्दतीचा तथ्यसंकनासाठी उपयोग केला. त्यानुसार तथ्यांचे वर्गीकरण सारणीकरण करून विश्लेषण केले. सांख्यिकी विश्लेषणासाठी `चे चा वापर करण्यात आला आहे. वय, धर्म, जात, शिक्षण, व्यवसाय, कौटूंबिक स्थिती, मासिक उत्पन्न, राजकीय पार्श्वभुमी या चलाच्या आधारे माहिती घेऊन त्यांचे विश्लेषण केले आहे.

*महिला आरक्षण धोरण आणि महिला लोकप्रतिनिधीच्या सक्षमीकरणाचे विश्लेषण व निर्वचन :*
स्वातंत्र्यानंतर लोकशाहीला बळकटी देण्यासाठी व ती ख—या अर्थाने विकेंद्रीत करण्यासाठी पंचायती राजव्यवस्था स्वीकारण्यांत आली. परंतु या पंचायती संस्था म्हणून प्रस्तापित होऊ शकल्या नाहीत. मागासलेल्या दबल्या गेलेल्या गटापर्यंत सत्ता पोहचु शकली नाही. या वंचितांमध्ये मागास जातीबरोबर महिला सुध्दा होत्या. आरक्षणपुर्व काळात जिल्हयात पंचायत राज्यसंस्थामध्ये महिलांचा राजकीय सहभाग अत्यल्प व परिणामशून्य राहिला आहे. 73 व्या घटनादुरूस्तीनंतर मात्र पंचायत राज्य संस्थामध्ये कधीही घरातुन बाहेर न पडणा—या सर्वच संवर्गातील महिला गावच्या तालुक्याच्या व जिल्हयाच्या कारभारणी झाल्या आहेत. राज्यकारभाराची सूत्रे सांभाळु लागल्या आहेत.
काका काळेलकर आयोग आणि बी.पी. मंडळ आयोगाने त्यांच्या अहवालात स्त्रीयांच्या प्रश्नांबाबत मांडणी करून त्यांना 'मागास'संबोधुन त्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी आरक्षण देण्याची शिफारस केली. त्याच्यांच परिणाम म्हणुन 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती करून महिलांना 1/3 आरक्षण पंचायत राज व्यवस्थेत बहाल करण्याचा निर्णय झाला. आता ते आरक्षण 50 टक्के झाले आहे. या आरक्षणाचा कर्जत तालुक्यातील महिलांच्या पंचायत राज व्यवस्थेतील सहभागावर जो परिणाम झाला त्यांचा अभ्यास या संशोधनाच्या माध्यमातुन घेण्यात आला आहे.
या महिला लोकप्रतिनिधीच्या वयाबाबतची स्थिती जाणुन घेतली तर असे आढळून आले की आरक्षणानंतर तरूण वयोगटातील म्हणजे 18 ते 40 या वयोगटातील महिला प्रतिनिधींची संख्या 62.33 टक्के आहे. वास्तविक याच वयोगटातील महिलांवर कौटुंबिक जबाबदारी जास्त प्रमाणात असते. तरीही त्यावर मात करून महिला राजकारणात सकिय सहभागी होत आहेत. आरक्षणानंतर अनुसूचित जाती जमातीतील महिला प्रतिनिधीची संख्या 38 टक्के तर इतरमागासगटातील महिला प्रतिनिधीची संख्या 43 टक्के तर सर्वसाधारण गटातील महिला लोकप्रतिनिधीची संख्या 19 टक्के आहे. अनुसूचित जाती, जमातीतील महिलां प्रतिनिधींना स्थानिक सत्तेत काम करताना प्रस्तापितांकडुन काही अडथळे निर्माण केले जातात पण आता आम्ही त्याला घाबरत नाही असेही मुलाखती दरम्यान सांगीतले. यावरून स्पष्ट होते की राजकीय सत्ता आपल्यासाठी नाही हा न्युनगंड त्यांच्यामधुन दुर होत आहे. आपण सत्ता राबवु शकतो निर्णय प्रकियेत सकिय भुमिका बजावु शकतो हा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये दिसुन आला.
आरक्षणानंतर साक्षर महिला लोकप्रतिनिधीची संख्या वाढत असल्याचे दिसुन आले. एकुण उत्तरदात्यामध्ये 10 वी 12 वी शिकलेल्या एकुण महिला प्रतिनिधीची संख्या 56 टक्के आहे. अशा महिला प्रतिनिधी प्रत्यक्ष ठराव वाचल्याशिवाय सही करत नाही असे सांगीतले. आत्मविश्वास व काम करण्याची इच्छाशक्ती दिसुन आली. पंचायत राज्यव्यवस्थेत निवडुण येणा—या महिला बहुतांशी राजकीय पार्श्वभुमी असलेल्या कुटुंबातीलच असतात असा समज आहे. आरक्षणानंतर हा समज खोटा ठरत आहे. कौटुंबिक पार्श्वभुमी नसलेल्या महिला प्रतिनिधीची संख्या ग्रामपंचायतीत 56.25 टक्के पंचायत समितीत 42.24 टक्के तर जिल्हापरिषदेत 26.52 टक्के आहे. महिला राजकारणात कोणत्या कारणांनी आल्यात हे जाणुन घेण्याचा प्रयत्न केला असता आरक्षणामुळेच आम्हाला संधी मिळाली असे सांगणा—या महिला प्रतिनिधीचे प्रमाण ग्रामपंचायतीत 75.32 टक्के तर पंचायत समिती व जिल्हा परिषदेत 100 टक्के आहे. यावरून स्पष्ट होते की स्थानिक सत्तेत महिलांना एवढया मोठया प्रमाणात आरक्षणामुळे संधी मिळाली. महिला आरक्षणामुळे ग्रामीण समाजात स्थानिक पातळीवर नवी सत्ता केंद्रे निर्माण झाली. स्थानिक महिलांच्या नेतृत्वांच्या विकासाला अनुकूल वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागात महिलांना नवीन आव्हाने पेलण्याची संधी मिळाली. आत्मविश्वास वाढला.

*निष्कर्ष व शिफारशी :*
आरक्षण धोरणामुळे पंचायत राज्याच्या आदान प्रदान प्रक्रियेत नेतृत्वाची राजकीय संस्कृती राजकीय सामाजिकरण राजकीय समावेशन यात बदल घडून आला. सर्वसाधारणपणे तरूण वयोगटातील उमेदवारांना नेतृत्वाची संधी मिळाली. आर्थिक स्थिती बिकट असलेल्या महिलांचे राजकीय समावेशन होऊ लागले. सामाजिक न्यायाच्या दृष्टने महत्वाचे पाऊल उचलण्यात आले. महिलांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण पातळीवर रचनात्मक वातावरण निर्माण करण्यात आले. लोकशाहीचा पाया अधिक रूंद झाला. आरक्षणाला तात्विक व व्यवहारीक आव्हानाना सामोरे जावे लागत आहे. यात पुरूषी वर्चस्व निवडुण आलेल्या महिलांचे पुरूष प्रधानतेचे आदर्श राजकीय पार्श्वभुमी नसलेल्या महिला पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास उत्सुक नसतात. राजकीय पार्श्वभुमी असलेल्या महिला मात्र पुन्हा निवडणुक लढविण्यास तयार असतात.
महिला लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. महिलांच्या सक्षमीकरणाचे उगम त्यांच्या मानसिकतेतुन होतो. त्यांच्यातील सुप्तशक्ती जागृत करून त्यांना कार्यप्रवण करणे आवश्यक आहे.

*संदर्भ ग्रंथसूची :*
1.व्होरा राजेंद्र, स्त्रियांचा राजकारणातील सहभाग, स्त्री न्याय कायदा, संपादक जया सांगडे, कसबा पेठ, पुणे 1998
2.ग्वाणकर रोहिणी, मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप, आदित्या प्रकाशन, कोथरूड, पुणे 1986
3.सुमंत यशवंत, स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004
4.भागवत विद्युत, स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिभा प्रकाशन, पुणे 2004
5.पाटील भारती, पंचायती राजसंस्थामधील स्त्रीयांचा सहभाग, प्रबोधन प्रकाशन, ज्योती जुलै 2001
6.पळशीकर सुहास, शासन संस्थांच्या निवडणुका आणि महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रकियांचे स्थानिक संदर्भ 2004
7.नानीवडेकर मेधा, महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2006
8.पंडित ग.शा. पंचायत राज आणि ग्रामीण महिला, सुगावा प्रकाशन, पुणे 06
9.रामदास पालेकर, संजय डाखोरे, 1998, आदिवासी वैद्यक परंपरा— एक विश्लेषणात्मक अभ्यास, माधवी प्रकाशन, माहिम, मुंबई
10.महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, रायगड जिल्हा 1996
11.कर्जत मंडळ अधिकारी यांच्याकडील आदर्श तक्ता 2007 मध्ये प्राप्त झालेल्या माहितीवर आधारीत.
12.ॲडिशनल डायरेक्टेर जनरल ऑफ मेटिओरॉलाजी रिसर्च पुणे यांच्याकडून 1984 मध्ये प्राप्त झालेल्या माहितीवर आधारीत.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net